# थोडक्यात पण महत्वाचे



## जुन्नर तालुक्याच्या विकासात वल्लभ बेनके यांचे मोठे योगदान

शिवनेरी (स. गांवकरी) : कांदळी येथे जुन्नर तालुका सहकारी औद्योगिक वसाहतीची स्थापना करून तालुक्याच्या विकासाला कै. माजी आमदार वल्लभ बेनके यांनी चालना दिली , तसेच तालुक्याच्या सर्वांगीण विकासात कै माजी आमदार वल्लभ बेनके यांचे मोठे योगदान आहे . असे श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना चेअरमन सत्यशील शेरकर यांनी सांगितले गौरव उद्गार काढले . कै. माजी आमदार वल्लभ बेनके यांच्या ७७ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन प्रसंगी चेअरमन शेरकर यांनी सांगितले . तालुक्याच्या सर्वांगीण विकासात माजी आमदार वल्लभ बेनके यांचे भरीव योगदान आहे असे सभापती संजय काळे यांनी सांगितले . प्राध्यापक ह भ प गणेश शिंदे यांनी समाज प्रबोधन प्रवचन केले . कार्याध्यक्ष अनिल मेहेर , जिल्हा परिषद सदस्य शरद लेंडे , तमाशा फड मालक रघुवीर खेडकर व आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

## भाचीला फोन केल्याच्या संशयातून तरुणाला मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

अहिल्यानगर (स. गांवकरी) : भाचीला फोन केल्याच्या संशयावरून एका तरुणाला लाकडी दांडके, लोखंडी गज तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना पोखर्डी अहिल्यानगर परिसरात बुधवारी २४ जून रोजी सायंकाळी घडली. याप्रकरणी चौघांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रवीण गुंड (वय ३७, रा. शेंडी, ता. अहिल्यानगर) हे बुधवारी सायंकाळी ७.२० वाजण्याच्या सुमारास ससेवस्ती येथील मैदानावर क्रिकेट खेळत असताना संशयित आरोपींनी मोबाईलवर संपर्क साधून त्यांना पोखर्डी येथील घरी बोलावून घेतले. तेथे 'तू माझी भाचीला फोन का करतोस?' असा जाब विचारण्यात आला. त्यावर फिर्यादीने, 'तुम्ही समजता तसे काही नाही. ती मला फोन करते म्हणून मी तिलाही फोन करतो', असे सांगितल्याने संशयित आरोपी संतप्त झाले.

## शेअर मार्केट फसवणूक प्रकरणातील संशयित अटकेत; पोलीस कोठडी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास अल्पावधीत मोठा आर्थिक परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून सांगमनेर तालुक्यातील अनेकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी येथील आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने संशयित आरोपी विजय तंबाजी काळे (वय ३९, रा. मालदार रोड, खुलेवाडी, ता. सांगमनेर) याला अटक केली आहे. गुरुवार दि. २५ जून रोजी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला चार दिवसांची म्हणजे दि. २९ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात विजय काळे आणि त्याच्या आणखी तीन साथीदारांविरुद्ध सांगमनेर शहर पोलीस ठाण्यात फसवणूक, एमपीआयडी कायदा तसेच इतर संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या माहितीनुसार, शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून जादा परतावा मिळवून देण्याचे आश्वासन देत संशयित आरोपींनी अनेकांकडून मोठ्या प्रमाणात रक्कम उभी केली. मात्र, गुंतवणुकीवरील परतावा न देता संबंधितांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप आहे.

## दिवा शिवसेनेच्या वतीने वह्या वाटप



ठाणे (स. गांवकरी) : कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून मतदारसंघात १० लाख मोफत वह्या वाटपाचा भव्य उपक्रम राबवण्यात येत आहे. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लावण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. याचेच औचित्य साधत आज दिव्यातील प्रभाग क्र २८ मधील गणेश नगर, बेडेकर नगर तसेच चिन्मय गेट येथील शाखा अंतर्गत शालेय विध्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आल्या प्रसंगी दिवा शिवसेना शहरप्रमुख तथा नगरसेवक रमाकांत मढवी यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. प्रसंगी नगरसेविका दर्शना चरणदास म्हात्रे, नगरसेविका साक्षी मढवी, नगरसेवक दीपक जाधव, चरणदास म्हात्रे, विभागप्रमुख शशिकांत पाटील, भूषण पाटील, दिनेश मोर, राम पवार, रुपेश मढवी आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



## आई-वडिलांच्या संस्कारांमुळे सचिवपदापर्यंत मजल : हेमंत धुमाळ

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्याचे भूमिपुत्र हेमंत धुमाळ यांची महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या सचिवपदी नियुक्ती झाल्याबद्दल श्रीगोंदा शहर व तालुक्याच्या वतीने भव्य नागरी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध मान्यवरांनी धुमाळ यांच्या कार्यकर्तृत्वाचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना हेमंत धुमाळ म्हणाले की, "श्रीगोंद्याच्या मातीत जन्म घेऊन राज्य तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी मिळाली, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. या यशामागे आई-वडिलांनी दिलेले संस्कार, त्यांची प्रेरणा आणि समाजाचे आशीर्वाद हेच खरे बळ आहे." त्यांनी सत्काराचे आयोजन करणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार मानले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी धुमाळ यांच्या कार्यक्षमतेचे कौतुक करत, "उत्कृष्ट कार्यशैली आणि प्रामाणिक सेवेमुळेच त्यांना सचिवपदापर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली," असे सांगितले. ज्येष्ठ नेते बाबासाहेब भोस यांनी धुमाळ यांनी श्रीगोंदा शहरातील विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत समाजाप्रती आपले सामाजिक दायित्व जपल्याचे नमूद केले. घनश्याम शेलार यांनी त्यांच्या यशामागे कुटुंबाची भक्कम साथ असल्याचे सांगितले. राजेंद्र नागवडे यांनी श्रीगोंदा तालुक्यातील पाण्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत विशेष प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी पोलीस अधिकारी हरीश खेडकर आणि ऊर्जा विभागाचे अधिकारी अरुण आनंदकर यांनी हेमंत धुमाळ यांच्या बालपणापासून ते आदर्श प्रशासकीय अधिकारी बनण्यापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास उपस्थितांसमोर उलगडला.

### प्राथमिक शाळा भौतिक आणि डिजिटल साधनांनी समृद्ध झाली

# तर भारत देश सामर्थ्यवान होईल : सुनील कडलग

गणोरे : (स. गांवकरी)



ग्रामीण भागातील प्रत्येक प्राथमिक शाळा ही ज्ञान देणारे जीवन शिक्षण मंदिर आहे. ही मंदिरे जर भौतिक आणि डिजिटल साधनांनी खऱ्या अर्थाने समृद्ध झाली, तर आपला भारत देश भविष्यात अधिक सामर्थ्यसंपन्न होईल. मात्र यासाठी केवळ शासन स्तरावर अवलंबून न राहता समाजातील प्रत्येक घटकाने आणि दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन आपले योगदान देण्याची नितांत गरज असल्याचे मत रोटरी क्लबचे संचालक सुनील कडलक यांनी व्यक्त केले.

गणोरे (ता- अकोले ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेवाडी येथे श्री व श्रीमती रामनारायणजी बुब ट्रस्ट व अप्रोच हेल्पिंग हॅन्ड फाउंडेशन, पुणेच्या वतीने शाळेसाठी अत्याधुनिक इंटरऍक्टिव्ह डिजिटल बोर्ड व ३५ विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. तसेच अनिकेत बॅटरी हाऊसकडून शाळेला इन्व्हर्टर बॅटरी देणगी म्हणून देण्यात आली. या शैक्षणिक साहित्याच्या लोकार्पण व वाटप सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून कडलग बोलत होते.

विस्तार अधिकारी अनिल गायकवाड यांनी आपल्या मनोगतात म्हणाले की चांगले शिक्षण हा विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा मुख्य पाया असून, शिक्षकांचे समर्पित योगदान आणि त्याला लाभलेली ग्रामस्थांची भक्कम साथ यांमुळेच शिंदेवाडी शाळा खऱ्या अर्थाने समृद्ध झाली आहे, असे गौरवोद्गार काढले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच संतोष आंबरे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून विविध कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन अशोक आहेर, संचालक राजेंद्र आंबरे, रोटरी क्लबचे संचालक सुनील कडलग, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिगंबर दातीर, पत्रकार जगन्नाथ आहेर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापिका वृषाली कडलग यांनी प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत केले. यानंतर उपस्थितांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय स्कूल बॅग आणि शूजचे वितरण करण्यात आले. नवीन शैक्षणिक साहित्य मिळाल्याने चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता. शिंदेवाडी प्राथमिक शाळा, सेंट्रल बँक ऑफ इंडिया व उमंग फाउंडेशन, मुंबई यांचे तर्फे स्वच्छतागृह व संरक्षण भिंत सीएसआर फंडा मधून बांधून देण्यात आली.रोटरी क्लब ऑफ संगमनेरचे माजी अध्यक्ष ऋषिकेश

मोंढे यांनी स्टील कपाट, प्रा. मंगल गोडगे यांच्याकडून विद्यार्थ्यांना शालेय वह्या , मुख्याध्यापिका वृषाली कडलग यांच्या मातोश्री स्व. रोहिणी राधाकृष्ण आरोटे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शाळेला पेवर ब्लॉक बसविण्यात आले व शाळेला रंग देऊन आणि बोलक्या भिंती बनविण्यात आल्या. दिगंबर दातीर शाळेसाठी स्टील ग्रील , कल्पना पाटील काच फलक , रविंद्र व गणेश आंबरे यांनी विद्यार्थ्यांच्या पोषण आहारासाठी जेवणाची ताटे , जिजाऊ बिग्रेड संगमनेर यांच्यातर्फे ३५ विद्यार्थ्यांना शालेय गणवेश , अनिता कोदे यांच्या कडून विद्यार्थ्यांना शूज आणि सॉक्स

अशा देणग्या शाळेला प्राप्त झाल्या. याप्रसंगी शाळा समितीच्या उपाध्यक्ष प्रियंका हांडे, अशोकराव आहेर, दत्तात्रय हांडे, रविंद्र काळे, विजय दातीर, प्रकाश आहेर, संतोष भालेराव, योगेश आंबरे , गणेश आंबरे, विशाल आंबरे, शीतल आंबरे , जयराम आंबरे, गोरख आहेर, गणेश दातीर , विनोद खतोडे, श्रीकांत खतोडे , डॉ. अतुल दातीर , अक्षदा आंबरे ,निशा खतोडे , ज्योती आंबरे , गणेश आंबरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेला मदत करणाऱ्या सर्व दानशूर संस्थांचे आणि व्यक्तींचे आभार मानण्यात आले. या उपक्रमामुळे शिंदेवाडी शाळेच्या डिजिटल शिक्षणाला मोठी गती मिळणार असून, ग्रामस्थांनी या स्तुत्य उपक्रमाचे विशेष कौतुक केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय हांडे यांनी तर आभार प्रदर्शन कल्पना पाटील यांनी केले.

## कोतूळ उपकेंद्रात सहाय्यक अभियंता पद रिक्त

कोतूळ : (स. गांवकरी)

■ नागरिकांची गैरसोय, हेमंत देशमुख यांचा आंदोलनाचा इशारा!

महावितरणच्या ३३/११ केव्ही कोतूळ उपकेंद्रातील सहाय्यक अभियंता हे महत्त्वाचे पद अनेक दिवसांपासून रिक्त असल्याने उपकेंद्राचा कारभार अक्षरशः रामभरोसे सुरू असून नागरिक, शेतकरी आणि वीज ग्राहकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. सध्या या उपकेंद्राचा अतिरिक्त कार्यभार ब्राह्मणवाडा येथील कक्ष अभियंत्यांकडे सोपविण्यात आला असला, तरी ते आठवड्यातून केवळ एकदाच कोतूळ उपकेंद्रात उपस्थित राहत असल्याने ग्राहकांची कामे रखडत आहेत. कायमस्वरूपी अधिकारी नसल्यामुळे उपकेंद्रांतर्गत वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, मीटर रीडिंगमध्ये चुका होणे, चुकीची वीजबिले येणे आणि ती दुरुस्त करण्यासाठी नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागणे, अशा समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. याशिवाय कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी संपर्क साधायचा तरी कोणाशी, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कोतूळ उपकेंद्रांतर्गत कोहने सबस्टेशनचाही समावेश असून अतिरिक्त कार्यभार असलेल्या अधिकाऱ्यांवर दोन उपकेंद्रांचा ताण आहे. १५ एमव्हीए क्षमतेच्या या उपकेंद्रावर ६,१४० घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहक, ४० पाणीपुरवठा योजना आणि सुमारे २,४०० कृषी पंप अवलंबून आहेत. येथे ११ केव्हीचे ७ फीडर कार्यरत असून आणखी ५ नवीन फीडरचे काम सुरू आहे. एवढा मोठा कारभार केवळ अतिरिक्त जबाबदारीवर चालविणे अवघड असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## निष्ठा नाते आणि नेतृत्व के के गांगुर्डे झाले कळवणचे काँग्रेस कर्णधार

■ काँग्रेस दिल्ली हाय कमांडची पसंती, जनतेची संमती के के गांगुर्डे यांना काँग्रेसचे सूत्र

कनाशी : (स. गांवकरी)



काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहून घटनेची तत्वे जपणारे, आदिवासी भागात रोखठोख भूमिका बजावणारे जनतेच्या मनामनात घर करून बसलेले नेते के. के. गांगुर्डे यांच्या कामाची दखल दिल्ली काँग्रेस हाय कमांडने घेतली आहे. त्यांना अधिकृतपणे कळवण तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाचे नियुक्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

के. के. गांगुर्डे यांची कामाची पद्धत इतर नेत्यांपेक्षा वेगळी आहे. जनतेच्या सुखात-दुःखात धावून जाणे, प्रत्येक कार्यकर्त्याला आपुलकीने वागवणे व सर्वसामान्य जनतेशी थेट नाते जोडणे, ही त्यांची ओळख आहे. कळवणच्या आदिवासी पाड्यांपासून ते बाजारपेठेपर्यंत प्रत्येक गावात गांगुर्डे सरांचे कार्यकर्ते व चाहते आहेत. लग्नकार्य असो वा दुःखाचा प्रसंग, गांगुर्डे तिथे आवर्जून हजर असतात. त्यामुळेच जनतेचा माणूस अशी त्यांची ख्याती आहे. कळवण हा आदिवासी बहुल तालुका आहे. येथील दुर्गम भागातील प्रश्न सोडवण्यासाठी के. के. गांगुर्डे यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे. रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण या मूलभूत प्रश्नांसाठी त्यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केला. काँग्रेस पक्षाच्या ध्येय-धोरणांनुसार आदिवासी बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. तर कधी रस्त्यावरची लढाई देखील ते कधी कमी पडले नाही त्यांच्या या कार्यामुळेच आदिवासी समाज त्यांच्याशी भावनिकरित्या जोडला गेला आहे. पक्षाशी निष्ठा, घटनेशी बांधिलकी व जनतेशी जिव्हाळ्याचे नाते या त्रिसूत्रीमुळे काँग्रेस हाय कमांडने के. के. गांगुर्डे यांच्या कामाची विशेष दखल घेतली. त्यांना अधिकृत कळवण तालुका काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती पत्र देण्यात आले. जनतेत मिळून मिसळून काम करणारे, संघटन बांधणीत तरबेज व आदिवासी भागात पक्ष वाढवणारे नेतृत्व अशा शब्दांत दिल्ली हाय कमांडने त्यांचे कौतुक केले आहे.

गांगुर्डे यांची तालुकाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने कळवण तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले आहे. सरांच्या नेतृत्वाखाली तालुक्यात काँग्रेस अधिक मजबूत होईल, असा विश्वास कार्यकर्ते व्यक्त करत आहेत. जनतेशी नाळ जोडलेले, पक्षाशी एकनिष्ठ व घटनेचा आदर करणारे के. के. गांगुर्डे यांच्या रूपाने कळवणला एक हक्काचा नेता मिळाला आहे, अशी भावना आज सर्वत्र व्यक्त होत आहे.

कळवण तालुक्यात माझे काम पाहता काँग्रेसच्या दिल्ली हाय कमांडणे जो विश्वास माझ्यासारख्या छोट्या कार्यकर्त्यावर टाकला त्या विश्वासाला मी तडा जाऊ देणार नाही पक्षाशी शेवटच्या श्वासापर्यंत एकनिष्ठ राहून तळागाळातील दुर्गम आदिवासी पाड्यांवरील जनतेपर्यंत जाऊन काँग्रेस पक्ष अधिक मजबूत करण्याचा माझा प्रयत्न राहील मला दिलेली जबाबदारी मी पूर्ण निष्ठेने प्रामाणिकपणे जनतेच्या सेवेसाठी पार पाडेल सुखदुःखात कळवणच्या जनतेबरोबर मी सदैव उभा राहील

**- के. के. गांगुर्डे अध्यक्ष, कळवण तालुका काँग्रेस कमिटी**

## वटवृक्ष देवस्थानसमितीचे चेअरमन - महेश इंगळे यांचे प्रतिपादन

### पोलिओ लसीकरण हे केवळ सरकारी मोहीम नसून समाजाच्या भविष्याची काळजी आहे

सोलापूर : (स. गांवकरी)



पोलिओ लसीकरण हे केवळ सरकारी मोहीम नसून समाजाच्या भविष्याची काळजी आहे. असे प्रतिपादन येथील श्री वटवृक्ष देवस्थान समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांनी केले.

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीमेचा शुभारंभ महेश इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी ते बोलत होते.

पोलिओ लसीकरण हे केवळ सरकारी मोहीम नसून समाजातील लोकप्रतिनिधींमार्फत राबविली जाणारी समाजाच्या भविष्याची काळजी असल्याचे प्रतिपादन येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांनी केले.

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानात आज राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण रुग्णालयाचे व्यवस्थापक तथा वैद्यकीय अधिकारी डॉ.अशोक राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली श्री वटवृक्ष देवस्थानचे चेअरमन व नगरसेवक महेश मालक इंगळे यांच्या हस्ते मंदीरातील व परिसरातील भाविकांच्या ५ वर्षांखालील बालकांना पोलीओ लसींचे २ थेंब मुखात घालून या लसीकरण मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नगरसेवक महेश इंगळे बोलत होते. या कार्यक्रमात मंदीरात उपस्थित ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओचा डोस देण्यात आला. आरोग्य सेवक संतोष सावडकर, आरोग्य सेविका श्रीमती कोरे यांनी लसीकरणाचे काम पाहिले. पर्यवेक्षक म्हणून बसवराज याबाजी व आरोग्य सेवक शाम पाटील यांनी काम पाहिले.

या मोहिमेत एकूण ८११ बालकांना पोलिओ डोस देण्यात आला. देवस्थान समितीच्या सहकार्याने लसीकरण मोहीम यशस्वी झाल्याबद्दल आरोग्य विभागाने समाधान व्यक्त केले. लसीकरण मोहीम यशस्वी होण्याकरीता अमर पाटील, संदीप गायकवाड, श्री स्वामी, श्रीकांत स्वामी आदींसह देवस्थानचे कर्मचारी व सेवेकऱ्यांनी परिश्रम घेतले.

यावेळी प्रथमेश इंगळे, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, प्रसाद सोनार, श्रीकांत मलवे, गिरीश पवार, विपूल जाधव, गणेश इंगळे, अविनाश क्षीरसागर आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.

## 'हरित नाशिक' लोकचळवळ व्हावी : गिरीश महाजन

नाशिक : (स. गांवकरी)

वाढते तापमान, अल निनोचे संकट आणि पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण आवश्यक आहे. त्यासाठी 'हरित नाशिक' उपक्रम ही लोकचळवळ व्हावी. या चळवळीत प्रत्येक नागरिकाने आपले योगदान द्यावे, असे आवाहन कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी येथे केले.

'उन्नत नाशिक अभियान' आणि नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहर आणि परिसरात 'हरित कुंभ - हरित मॉन्सून' उपक्रम 28 जून ते 25 ऑक्टोबर 2026 या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आज फाशीचा डोंगर परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महापौर हिमगौरी आडके-आहेर, उपमहापौर विलास शिंदे, स्थायी समितीचे सभापती मच्छिंद्र सानप, जिल्हाधिकारी



आयुष प्रसाद, मुख्य वनसंरक्षक गजेंद्र हिरे, नगरसेवक श्याम बडोदे, दिनकर पाटील, अमोल पाटील आदी उपस्थित होते. मंत्री श्री. महाजन म्हणाले की, नाशिक शहरात 'उन्नत नाशिक अभियान' राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज सकाळी कपिला नदी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. यापूर्वी नंदिनी नदी स्वच्छता अभियान राबविण्यात आले होते. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नेहमीच स्वच्छतेसाठी आग्रही असतात. त्यामुळे प्रत्येकाने स्वच्छतेसाठी आपले योगदान दिले पाहिजे.

# आषाढी यात्रा कालावधीत स्वच्छतेला प्राधान्य द्यावे

**पालकमंत्री जयकुमार गोरे**

सोलापूर : (स. गांवकरी)



आषाढी वारीच्या अनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी क विविध ठिकाणांची पाहणी केली. आणि सर्व वरिष्ठ अधिकारी स्वच्छतेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले.

पंढरपूर येथील आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै २०२६ रोजी असून, या यात्रा सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपुरात पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येत असतात. या यात्रा कालावधीत प्रशासनाने वारकरी भाविकांना पायाभूत सुविधा देण्याबरोबरच स्वच्छतेला प्राधान्य द्यावे अशा सूचना ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.

आषाढी वारी 2026 अनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी वाखरी पालखीतळ, 65 एकर व वाळवंट येथे पाहणी केली, त्या प्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार,पोलिस उप विभागीय अधिकारी प्रशांत डगळे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सह आयुक्त नगरपालिका आशिष लोकरे, अन्न धान्य पुरवठा अधिकारी ओंकार पाडोळे, वीज वितरण चे अधीक्षक अभियंता सुनील माने, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत भुजबळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, पंढरपूर उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव यांच्यासह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, गतवर्षी आषाढी यात्रा कालावधीत प्रशासनाने वारकरी भाविकांसाठी यात्री पालखीतळ, भक्ती सागर (65 एकर), येथे चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या त्याचप्रमाणे आताही चांगल्या व अधिकच्या सुविधा उपलब्ध कराव्यात. वाखरी पालखी तळावर कायम असणाऱ्या शौचालय परिसरात कॉंक्रिटीकरण करून घ्यावे. पालखी तळावरील खड्डे बुजवावेत तसेच मुरमीकरण करून सपाटीकरण करावे. प्रकाश व्यवस्था करावी. पालखी तळावर पाणी साठू नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात.

कॉलेज चौकातील पुलाचे काम अपूर्ण असून ते तात्काळ पूर्ण करावेत सदरच्या कामाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात राडारोडा पडल्याने अपघात होण्याची शक्यता असून, संबंधित ठेकेदाराने ते काम तात्काळ व वेळेत पूर्ण करावे. अन्यथा संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी. तसेच ते काम करण्यासाठी कार्यक्षम ठेकेदार नेमून तात्काळ पूर्ण करावे. शहरातील रस्ते व डिव्हायडर स्वच्छ करावे. आवश्यक ठिकाणी डिव्हाइडरला रंगकाम करावे. आषाढी यात्रेत भाविकांच्या मोठ्या प्रमाणात निधीची उपलब्धता केली असून, जिल्ह्यात पालखी सोहळे दाखल होण्यापूर्वी सर्व सुविधा उपलब्ध ठेवाव्यात. सरगम चौकातील पुलाखालून वाळवंटापर्यंत रस्ता नगरपालिकेने करावा. 65 एकर येथे स्वच्छता, पिण्याचे पाणी, विद्युत पुरवठा, वैद्यकीय सुविधा उपलब्धता बरोबर स्वच्छता ठेवावी.

चंद्रभागा पत्राच्या काठावरील काटेरी झाडे झुडपे काढावीत तसेच मातीचे ढिगारे काढून सपाटीकरण करावे अशा सूचनाही पालकमंत्री गोरे यांनी दिल्या. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी वाखरी पालखीतळ, भक्ती सागर (६५ एकर), चंद्रभागा नदीपात्र येथील पाहणी केली.

# थोडक्यात पण महत्वाचे



## लिंपणगावमध्ये पल्स पोलिओ मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव कार्यक्षेत्रात रविवारी (दि. 28 जून) आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या मोहिमेत 0 ते 5 वर्षे वयोगटातील 90 टक्क्यांहून अधिक बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात आले. मोहिमेचे उद्‌घाटन ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर व गावचे माजी सरपंच अरविंद कुरुमकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुखदेव वाल्हेकर, लिंपणगाव आरोग्य उपकेंद्राच्या समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. पल्लवी साबळे, आरोग्य सेविका मनीषा नवले, आरोग्य सेवक नेताजी ठुबे, तसेच आशा सेविका, अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होत्या. आरोग्य विभागाच्या "आपली दोन थेंबांची जबाबदारी – पोलिओमुक्त भारताची तयारी" या अभियानांतर्गत तालुक्यातील सर्व आरोग्य उपकेंद्रांमध्ये ही मोहीम राबविण्यात आली. यावेळी "पोलिओपासून 100 टक्के संरक्षण, अपंगत्वापासून बचाव आणि मुलांचे निरोगी भविष्य सुरक्षित" या विषयांवर जनजागृती करण्यात आली. या मोहिमेत लिंपणगाव, होलेवाडी, मुंढेकरवाडी, पवारवाडी आणि शेंडेवाडी येथील सर्व पात्र बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देण्यात आली. लिंपणगाव आरोग्य उपकेंद्रातील अधिकारी, कर्मचारी, आशा व अंगणवाडी सेविकांनी सायंकाळी पाच वाजेपर्यंत ही मोहीम यशस्वीपणे राबवून उल्लेखनीय कामगिरी बजावली.

## अध्यक्षपदी डॉ. निलेश पगार, तर सेक्रेटरी पदी डॉ. भगवान टोम्पे




कळवण (स. गांवकरी) : कळवण तालुक्यातील वैद्यकीय क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी घडामोड, कळवण तालुका मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी वक्रतुंड हॉस्पिटलचे संचालक डॉ. निलेश वसंत पगार यांची, तर सेक्रेटरी पदीं छत्रपती हॉस्पिटलचे संचालक डॉ. भगवान टोम्पे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे तालुक्यातील वैद्यकीय क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. डॉ. भगवान टोम्पे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य देत ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे आणि रुग्णांशी असलेल्या आत्मीय नात्यामुळे त्यांनी समाजात विश्वासार्ह स्थान निर्माण केले आहे छत्रपती हॉस्पिटल कळवण. त्याचप्रमाणे डॉ.निलेश वसंत पगार यांनीही वैद्यकीय सेवेसोबत सामाजिक बांधिलकी जपत अनेक आरोग्यविषयक उपक्रम राबविले असून त्यांच्या संघटन कौशल्याचा मेडिकल असोसिएशनला निश्चितच लाभ होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे वक्रतुंड हॉस्पिटल कळवण.

## पल्स पोलिओ मोहीम ९४.४ टक्के उत्स्फूर्तपणे प्रतिसाद

निमगाव सावा (स. गांवकरी) : प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पल्स पोलिओ मोहीमेचा शुभारंभ जिल्हा परिषद सदस्या कल्पना वैभव काळे, रविंद्र शेखर , गणेश गाडगे होमगार्ड, पत्रकार अजित गणपत गाडगे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी निमित्ताने व निमगाव सावा येथील ग्रामस्थ,पंचायत समिती सदस्य संभाजी चव्हाण, सामाजिक कार्यकर्ता किरण गोत्राळ, पत्रकार सुनिल गहिने उपस्थित होते. निमगाव सावा आणि व परिसरातील सर्व उपकेंद्र पारगाव तर्फे आळे, औरंगपुर, मंगरूळ,साकोरी, शिरोली या गावातील लहान बालके तसेच आजुबाजुच्या शेतीकामासाठी गावावरुन आलेल्या मजुरांच्या बालकांनाही पल्स पोलिओचा डोस देण्याच्या सूचना त्यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना दिल्या. याप्रसंगी जुन्नर तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अश्विनी कुलमुथे यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी डॉ स्वरूप गिरी, डॉ.राजश्री पाचेगांवकर , आरोग्य सहायक श्री यादव,म्हारासे,श्रीमती सुनिता सोनवणे,नुरजहा शेख,आरोग्य सेविका आरती लांघी ,रविराज शेजूळ, आरोग्य सेविका पुजा पवार,येगिता बहेडे, आशा वर्कर मिनाज पटेल,अर्ध परिचर अलका लोंखडे,या सर्व लसीकरणासाठी ॲम्बुलन्स चालक रुपेश बहेडे यांचे विशेष सहकार्य मिळाले सर्व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

## उदापूर ते जांभुळशी रस्त्याची दुरावस्था

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : उदापूर ते जांभुळशी या मुख्य रस्त्याची अत्यंत दयनीयअवस्था झाली असून वाहनचालकांसह ग्रामस्थांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. ठिक ठिकाणी मोठमोठे खड्डे,खडी उखडलेला खडीचा रस्ता आणि पावसाचे साचलेले पाणी यामुळे हा रस्ता अक्षरशःमृत्यूचासापळा बनला आहे.या मार्गावर दररोज शालेय विद्यार्थी,शिक्षक,शेतकरी दुचाकीस्वार तसेच चारचाकी वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र खड्ड्यांमुळे वाहनांचे वारंवार अपघात होत असून वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने खड्डयां चा अंदाज येत नाही,अपघाताची शक्यता अधिक वाढते. स्थानिक ग्रामस्थांनी अनेक वेळा संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागा कडे रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केली आहे.मात्र अद्याप कोणती ही ठोस कार्यवाही झालेली नाही त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ग्रामस्थांची मागणी आहे की, या रस्त्याची तातडीने पाहणी करून खड्डे बुजविण्यात यावेत तसेच संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरण करून कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात यावी.अन्यथा मोठी दुर्घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील,असा इशाराहीग्रामस्थांनी दिला आहे.

## ...तर मतदार यादीतून नाव वगळले जाण्याची शक्यता

भोकर (स. गांवकरी) : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष गहन पुनर्निरीक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने 85 भोकर विधानसभा मतदारसंघातील सर्व BLO, BLO पर्यवेक्षक, BLA तसेच विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण कार्यशाळा रविवारी गणराज रिसॉर्ट, नांदेड रोड, भोकर येथे उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत गणना फॉर्म वेळेत न भरल्यास संबंधित मतदाराचे नाव प्रारूप मतदार यादीतून वगळले जाण्याची शक्यता असल्याचा महत्त्वपूर्ण इशारा देत सर्व मतदारांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले (IAS) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी प्रवीण मेनशेट्टी यांच्या उपस्थितीत आयोजित या कार्यशाळेस भाजपचे दिवाकर रेड्डी, शिवसेना (शिंदे गट)चे माधव वडगावकर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चे संतोष आलेवाड, आरपीआय (आठवले गट)चे जयभीम पाटील, प्रहारचे शेखर कुंटे, आम आदमी पक्षाचे सय्यद अलमास, नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, उपनगराध्यक्ष दिलीप सोनवडे, BLA-1 रामचंद्र मुसळे यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे BLA, BLO, BLO पर्यवेक्षक, नगरसेवक व सुमारे 400 ते 500 प्रतिनिधी उपस्थित होते.

# जांभळेवाडी शाळेच्या नवीन इमारतीचे लोकार्पण

## विद्यार्थी सत्कार, शैक्षणिक साहित्य वाटप व वृक्षारोपण उत्साहात!




अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील जि. प. प्राथमिक शाळा जांभळेवाडी (सातेवाडी) येथे नव्याने उभारण्यात आलेल्या शाळेच्या इमारतीचे लोकार्पण, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, मोफत शैक्षणिक साहित्य वाटप आणि वृक्षारोपण असा विविध उपक्रमांनी युक्त कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यसम्राट आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते शाळेच्या नवीन इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनियुक्त सरपंच केशव गोविंद बुळे होते. यावेळी विस्तार अधिकारी अरविंद कुमावत, वन विभागाचे अधिकारी दत्तात्रय पडवळे, शंकर लांडे, रामचंद्र बुळे, प्रकाश आढळ, केंद्रप्रमुख वाकचौरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या प्रयत्नातून, वन विभाग, पंचायत समिती, ग्रामपंचायत, ग्रामविकास मंडळ आणि शाळेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही सुसज्ज शाळा इमारत साकार झाली. आकर्षक रंगकाम व डिजिटल सजावटीमुळे शाळेचे वातावरण अधिक आनंददायी बनले असून मान्यवरांनी नवीन वर्गखोल्यांची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमादरम्यान शाळेच्या परिसरात सावली देणाऱ्या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच नवोदय, शिष्यवृत्ती, एनएमएमएस तसेच दहावी-बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा ग्रामविकास मंडळाच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

लोकनियुक्त सरपंच केशव बुळे यांच्या पुढाकारातून दरवर्षीप्रमाणे यंदाही गावातील नऊ शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना वह्या, शैक्षणिक साहित्य व इतर आवश्यक वस्तूंचे वितरण करण्यात आले.

मार्गदर्शन करताना आमदार डॉ. किरण लहामटे यांनी गावातील एकीचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी शिक्षण, क्रीडा व आरोग्य यांचा समतोल साधून उज्ज्वल भविष्य घडवावे, समाजाभिमुख बनावे आणि व्यसनमुक्त जीवन जगावे, असे आवाहन केले. जांभळेवाडी शाळेतील विद्यार्थी दरवर्षी नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता सिद्ध करत असल्याचे सांगत त्यांनी शिक्षक व ग्रामस्थांचे अभिनंदन केले.

शाळेच्या रंगरंगोटी व डिजिटल सजावटीसाठी लोकवर्गणीतून सुमारे दीड लाख रुपयांचा निधी उभारण्यात आला. यासाठी ग्रामविकास मंडळ, ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी देणगीदार, आदिवासी विचार मंच महाराष्ट्र राज्य, बिरसा ब्रिगेड आणि विविध सामाजिक घटकांनी सहकार्य केले.

कार्यक्रमास जांभळेवाडी केंद्रातील मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामविकास मंडळ, बिरसा ब्रिगेड, आदिवासी विचार मंच, पालक, विद्यार्थी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदि धर्मा दिघे व प्रा. सुरेश मुठे यांनी केले, प्रास्ताविक आदि वसंत मुठे यांनी केले, तर आभार आदि नामदेव मुठे यांनी मानले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## यश कुरुमकर प्रशिक्षण पूर्ण करून देशसेवेसाठी सज्ज

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)



श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव कार्यक्षेत्रातील मुंढेकरवाडी येथील भूमीपुत्र यश संभाजी कुरुमकर याने भारतीय सैन्य दलाचे कठोर लष्करी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून देशसेवेसाठी सज्ज होत गावासह संपूर्ण परिसराचा मान उंचावला आहे. यश हा प्रगतिशील शेतकरी तथा ॲड. प्रदीप संभाजी कुरुमकर यांचा धाकटा भाऊ आणि श्री संभाजी हौसराव कुरुमकर यांचा सुपुत्र आहे. त्याने पुणे येथील बॉम्बे सेपर्स येथे भारतीय सैन्याचे कठीण प्रशिक्षण पूर्ण केले असून, राजस्थान रेजिमेंट (267) मध्ये नियुक्ती होऊन तो बिकानेर येथे देशसेवेसाठी रवाना झाला आहे. यशने श्रीगोंदा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातून बारावी (क्रॉप सायन्स) शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर महाविद्यालयाच्या श्री छत्रपती अकॅडमीमध्ये लष्करी प्रशिक्षण घेत असताना बी.ए. पदवी आणि एनसीसीचे शिक्षणही पूर्ण केले. त्याला प्रा. वैभव सोनवणे, प्रा. डॉ. सतीश चोरमले, प्रा. एन. टी. पवार आणि प्रा. डॉ. महेश गिरमकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

लहानपणापासून देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगलेल्या यशने अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर हे यश मिळवले. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे मुंढेकरवाडी, कुरुमकर नगर आणि परिसरात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## श्री शिवराज्याभिषेक उत्सवाने जामखेड शिवमय

- भव्य मिरवणुकीने सांगता.
- रक्तदान, कीर्तन, पोवाडे, जलाभिषेक व ऐतिहासिक मिरवणुकीने निर्माण केली जामखेडची नवी परंपरा

जामखेड : (स. गांवकरी)




हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, अर्थात हिंदवी स्वराज्य दिनानिमित्त जामखेड येथे श्री शिवराज्याभिषेक उत्सव समितीच्या वतीने दि. २३ ते २७ जून २०२६ या कालावधीत आयोजित श्री शिवराज्याभिषेक उत्सव सोहळा उत्साहात व शिवमय वातावरणात संपन्न झाला. धार्मिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांच्या मालिकेने जामखेड नगरी पाच दिवस अक्षरशः शिवभक्तीत न्हाऊन निघाली. उत्सवाची सुरुवात दि. २३ जून रोजी विनोदसम्राट ह भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे, नेवासा यांच्या विनोदी शैलीतील कीर्तनाने झाली. दि २४ जून रोजी भागवताचार्य ह.भ.प. समाधान महाराज शर्मा, केज यांनी प्रखर वाणीने भागवत कीर्तनातून प्रबोधन केले. दि. २५ जून रोजी गौरव महाराष्ट्राचा शिवशाहीर पृथ्वीराज माळी, सांगली यांच्या शौर्यगाथा व पोवाड्यांनी उपस्थितांच्या अंगावर शहारे आणले. दि. २६ जून हा दिवस सामाजिक बांधिलकीचा ठरला. सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित भव्य रक्तदान शिबिरात १७२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक कर्तव्य बजावले. सायंकाळी कीर्तनचंद्रिका ह.भ.प. रोहिणीताई परांजपे-माने, पुणे यांनी "राजमाता जिजाऊ - महिला सक्षमीकरण"या विषयावर प्रबोधनात्मक कीर्तन केले. ‘मुलगी वाचवा, समाजात सकारात्मक बदल घडवा’ हा संदेश त्यांनी दिला. महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

दररोजच्या कार्यक्रमात शिवप्रेमी व माता-भगिनींची संख्या उल्लेखनीय होती. पावसाची शक्यता लक्षात घेऊन संपूर्ण वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात आला होता. शिव महाप्रसादाचे नियोजनही उत्कृष्ट पद्धतीने करण्यात आले. उत्सव समितीच्या वतीने जामखेड तालुक्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या, राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू, सैन्य व पोलीस दलात भरती झालेले युवक, शासकीय सेवेत रुजू झालेले अधिकारी व आध्यात्मिक क्षेत्रात कार्यरत मान्यवरांचा विशेष सन्मान करण्यात आला. दि. २७ जून, शनिवारी पहाटे ५ वाजता सप्तनद्या, गडकोट व तीर्थक्षेत्रांहून आणलेल्या पवित्र जलाने व वेदमंत्रांच्या घोषात छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीवर जलाभिषेक करण्यात आला. पहाटेच्या या सोहळ्यास जामखेडकर शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण वातावरण शिवमय झाले होते. दुपारी छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड येथून श्री गणेशाच्या आरतीने भव्य दिव्य मिरवणुकीस प्रारंभ झाला. मिरवणुकीत अश्वपथक, ध्वज पथक, हलगी पथक, धर्मयोद्धा ढोल पथक, राजस्थानातील वाद्यपथक, लाठी-काठी व शस्त्र पथक, देव मामलेदार बँजो पथक, अहिल्यानगर येथील रोप मल्लखांब मुलींचे पथक यांनी आपल्या उत्कृष्ट कला सादर करून जामखेडकरांची मने जिंकली.

## किनवटमध्ये राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद; ९०.६८ टक्के बालकांना पोलिओ डोस

किनवट : (स. गांवकरी)



राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत किनवट शहरातील नागरी दवाखान्यात रविवारी "दो बूंद जिंदगी के" या जनजागृती अभियानाचा शुभारंभ नगराध्यक्षा सुजाताताई येंड्रलवार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पालकांनी आपल्या बालकांना पोलिओचा डोस पाजण्यासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. किनवट शहराची अंदाजित लोकसंख्या ३२,४९२ असून, ० ते ५ वर्षे वयोगटातील ३,३८३ बालकांना पोलिओचा डोस देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. दिवसभरात ३,०६८ बालकांना पोलिओचा डोस पाजण्यात आला असून, ९०.६८ टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित बालकांपर्यंतही पोलिओ लसीकरणाचा लाभ पोहोचविण्यासाठी आरोग्य विभागामार्फत पुढील नियोजन करण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली. ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी शहरात २१ पोलिओ बुथ कार्यान्वित करण्यात आले होते. मोहिमेत २ वैद्यकीय अधिकारी, ३ सुपरवायझर आणि ६० कर्मचारी यांनी सहभाग घेऊन बालकांपर्यंत लसीकरण सेवा पोहोचविण्यासाठी दिवसभर परिश्रम घेतले. राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी डॉ. किरणकुमार नेम्मानीवार, डॉ. तोटवाड, डॉ. ओव्हाळ, डॉ. चंद्रे, डॉ. संजीवनी पल्लेवाड, डॉ. सावंत, डॉ. पोहरकर, डॉ. तोटरे, डॉ. केंद्रे, डॉ. फिसके, डॉ. आरटवाड, डॉ. पूजा राठोड, डॉ. ज्योती सोनटक्के, चाटे (औषध निरीक्षक), गुरव सतीश, कोरेटलु, नागभीडे, श्रीमती मडावी, वाढई, चव्हाण, तायडे, तोटावाड मामा, सायरा बी, सोनकांबळे, जयपाल राठोड तसेच नागरी दवाखाना, किनवट येथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी पालकांना आपल्या पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओचा डोस देण्याचे आवाहन केले. पोलिओमुक्त समाज घडविण्यासाठी प्रत्येक पालकाने जबाबदारीची जाणीव ठेवून अशा लसीकरण मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही यावेळी सांगण्यात आले.

## अखेर लिंपणगावचे सिद्धेश्वर मंदिर भक्तांसाठी खुले

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील धार्मिक क्षेत्रात महत्त्वाचे स्थान असलेल्या लिंपणगावच्या ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज मंदिराचे दरवाजे अखेर भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात आले आहेत. गेल्या वर्षभरापासून सुरू असलेल्या जीर्णोद्धाराच्या कामामुळे भाविकांना गाभाऱ्यातील पिंडीपर्यंत दर्शन घेण्यास निर्बंध होते. आता हे निर्बंध हटविण्यात आल्याने ग्रामस्थ व भाविकांमधून समाधान आणि आनंद व्यक्त केला जात आहे. पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत असलेल्या या प्राचीन मंदिराच्या संवर्धनासाठी विभागाकडून नियमानुसार जीर्णोद्धाराचे काम सुरू आहे. यापूर्वी मंदिरात करण्यात आलेले रंगकाम, फरशी व इतर काही बांधकामे पुरातत्त्व विभागाच्या निकषांनुसार मान्य नसल्याने ती काढून टाकण्यात आली. यामुळे जीर्णोद्धाराचे काम




- ग्रामस्थ व भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण

काही काळ वादाच्या भोवऱ्यात सापडले होते. या प्रकरणात ग्रामस्थ, कार्यकर्ते आणि संबंधित यंत्रणांमध्ये मतभेदही निर्माण झाले होते.

त्यानंतर पुरातत्त्व विभागाने नव्याने निधी उपलब्ध करून देत नियोजनबद्ध पद्धतीने मंदिर परिसराचा जीर्णोद्धार सुरू केला.

# मन की बात कार्यक्रमाचे सामूहिक श्रवण

## भाजपच्या संघटनात्मक आढावा बैठकीत एस.आय.आर मोहिमेवर भर



किनवट : (स. गांवकरी)

भारतीय जनता पक्षाच्या वतीने किनवट येथे रविवारी आयोजित करण्यात आलेल्या संघटनात्मक आढावा बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या "मन की बात" कार्यक्रमाचे सामूहिक व थेट श्रवण करण्यात आले. यानंतर विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (एसआयआर) अंतर्गत मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आगामी काळात बूथस्तरावर प्रभावी काम करण्याचे आवाहन यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना करण्यात आले. या बैठकीस भाजपचे प्रदेश महामंत्री सुनील राणे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी मराठवाडा समन्वयक ॲड. नितीन काळे, जिल्हा प्रभारी किरण पाटील, आमदार भीमराव केराम, जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीस विधानसभा क्षेत्रातील बीएलए-१, बीएलए-२, बूथ प्रमुख, पक्षाचे विविध पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. यावेळी मार्गदर्शन करताना प्रदेश महामंत्री सुनील राणे यांनी विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (एस.आय.आर.) मोहिमेचे महत्त्व विशद केले. मतदार यादी अद्ययावत ठेवण्यासाठी बूथस्तरावर काटेकोरपणे काम करण्याच्या सूचना देत किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघातील एकही पात्र मतदार मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. आमदार भीमराव केराम यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना आगामी तीन महिने संघटनात्मक कार्यासाठी पूर्ण क्षमतेने काम करण्याचे आवाहन केले. मतदार यादी शुद्धीकरण हे केवळ निवडणुकीचे नव्हे तर लोकशाही बळकट करण्याचे महत्त्वाचे कार्य असल्याचे सांगत प्रत्येक बूथवर जबाबदारीने काम करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. मराठवाडा समन्वयक ॲड. नितीन काळे यांनी एसआयआर मोहिमेत आमदार भीमराव केराम व त्यांच्या कार्यसंघाने केलेल्या कार्याचे कौतुक केले. आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देत किनवट-माहूर विधानसभा क्षेत्रात झालेल्या विकासकामांचाही गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळकृष्ण कदम यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बीएलए-१ बाबुराव केंद्रे, मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनीवार, उमाकांत करहाळे, बालाजी आलेवार, माहूरचे निळकंठ मस्के यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी माजी नगराध्यक्ष दिनकरराव चाडावार, आनंद मच्छेवार, शिवराज राघु मामा, गोविंद अंकुरवाड, कपिल करेवाड, प्रा. राजेंद्र केशवे, संदीप केंद्रे, व्यंकटराव नेम्मानिवार, दिनकर दहिफळे, अशोक नेम्मानिवार, श्रीनिवास नेम्मानिवार, श्रीकांत घोडेकर, संजय रेड्डी येल्टीवार, दत्ता आडे, ॲड. नैतिक नाईक, बबलू नाईक, भगवान हुरदुके, संतोष पेळे, पप्पू अरमाळकर, प्रदीप येडके, स्वाप्निल गरडे, सागर पिसारीवार, विश्वास कोल्हारीकर, सागरताई शिंदे, यांच्यासह मोठ्या संख्येने भाजप पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या व कार्यकर्ते उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्वाचे



## आंबित धरण ओव्हरफ्लो; शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण!

अकोले (स. गांवकरी) : अकोले तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या समाधानकारक पावसामुळे आंबित धरण आज पूर्ण क्षमतेने भरून ओव्हरफ्लो झाले. धरणाच्या भिंतीवरून पाण्याचा विसर्ग सुरू झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून धरणाचे मनमोहक दृश्य पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली. धरण भरल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यंदाच्या खरीप हंगामासाठी सिंचनाच्या पाण्याची उपलब्धता वाढणार असल्याने पिकांना फायदा होणार आहे. तसेच सततच्या पावसामुळे भूजल पातळीतही वाढ होण्यास मदत होणार असल्याने विहिरी आणि बोअरवेल्सनाही दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. धरण ओव्हरफ्लो झाल्याने शेतकरी आणि नागरिकांनी समाधान व्यक्त करत चांगल्या पावसाबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

## मंत्री चिराग पासवान यांनी घेतले दर्शन



नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान यांनी नांदेड येथील दौऱ्यात सुप्रसिद्ध श्री हजूर साहिब सचखंड गुरुद्वारास भेट देवून दर्शन घेतले. यावेळी गुरुद्वाराचे पुजारी यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्यासोबत त्यांचे कुटूंबिय यांची उपस्थिती होती. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसिलदार संजय वारकड, जिल्हा कृषी अधीकारी दत्तकुमार कळसाईत, एमआयडीसी मॅनेजर गजानन कपाळे आदीची उपस्थिती होती. यावेळी केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारात लंगर प्रसाद घेवून सेवा केली.

## राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम अंतर्गत आज प्राथमिक आरोग्य केंद्र, येळेगाव येथील आयुष्मान आरोग्य मंदिरात जिल्हास्तरीय शुभारंभ करण्यात आला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सुर्यवंशी यांच्या हस्ते ५ वर्षांखालील बालकांना पोलिओचे डोस पाजून मोहिमेची सुरुवात झाली. कार्यक्रमास तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय कासराळीकर, सरपंच प्रशासक सरस्वती गंगातीर, वैद्यकीय अधिकारी डॉ. बाळासाहेब पवार, डॉ. युवराज बनसोडे तसेच आरोग्य विभागातील अधिकारी उपस्थित होते. यावेळी डॉ. सुर्यवंशी यांनी पोलिओ निर्मूलनासाठी लसीकरणाचे महत्त्व अधोरेखित करत एकही बालक पोलिओ डोसपासून वंचित राहू नये असे आवाहन केले. विशेषतः साखर कारखाना वसाहत, विटभट्टी आणि चुनाभट्टी परिसरातील ० ते ५ वर्षांखालील सर्व बालकांचे लसीकरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्ह्यातील सर्व आयुष्मान आरोग्य मंदिर व प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत बूथवर लसीकरणाची व्यवस्था करण्यात आली असून, जे बालक बूथवर येऊ शकणार नाहीत त्यांच्यासाठी गृहभेटीद्वारे लसीकरण पूर्ण केले जाणार आहे. जिल्हा प्रशासनाने पालकांना आपल्या ० ते ५ वर्षांखालील बालकांना पोलिओचे 'दोन थेंब' पाजून मोहिमेला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.



## ७२३२ बालकांना पल्स पोलिओ डोस

नवीन नांदेड (स. गांवकरी) : जागतिक पल्स पोलिओ लसीकरण अंतर्गत मनपाच्या सिडको मातृ सेवा आरोग्य केंद्र अंतर्गत 22 केंद्रावर वैद्यकीय अधिकारी डॉ संतोष शिंदे, डॉ.मनिषा बदने यांच्या मार्गदर्शनाखाली 7232 बालकांना पल्स पोलिओ लसीकरण देण्यात आले. जागतिक पल्स पोलिओ लसीकरण अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेचे आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे यांच्या अधिपत्याखाली 28 जुनं रोजी आरोग्य विभागाचे उपायुक्त अजितपाल संधू,मनपाचे डॉ.रिठे सिडको मातृ सेवा आरोग्य केंद्राचे डॉ.संतोष शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली,आरोग्य सहाय्यक एस.एम. आरगुलवार, परिचारिका प्रियंका रच्चेवार, मिनाक्षी शिंदे, औषध निर्माण अधिकारी ओंकार सुर्यवंशी, आरोग्य सेवकव्हि.एन.गलपवाड परिचारिका जयश्री दरेगावे, गोविंद क्षिरसागर सेवक सर्व आशा वर्कर्स यांनी पल्स पोलिओ लसीकरण मोहीमेत सहभाग नोंदविला. भाजपा नगरसेविका तथा आरोग्य समिती सदस्य सौ. सुवर्णा सतिश बसवदे यांनी मातृ सेवा आरोग्य केंद्र येथे भेट दिली, सकाळी 8 ते 5 दरम्यान 22 केंद्रावर 7232 बालकांना पल्स पोलिओ लसीकरण करण्यात आले.

## गरज नसलेला शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याचा शेतकऱ्यांचा निर्धार



सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूरात गरज नसलेला शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याचा आज शेतकऱ्यांनी निर्धार केला आहे आणि या शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांनी आज मोठा विरोध दर्शविला आहे. गरज नसलेल्या शक्तीपीठ महामार्गाविरोधात सोलापूर जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांच्या मेळाव्यास खासदार धैर्यशील मोहिते- पाटील, माजी खासदार राजु शेट्टी यांच्यासह करकंब, सोलापूर येथे उपस्थित होते. गरज नसलेला शक्तीपीठ महामार्ग हा कंत्राटदारांच्या हितासाठी राबवला जात असून, एजंटांमार्फत शेतकऱ्यांवर जमिनी विकण्याचा दबाव आणला जात आहे. ही शेतकऱ्यांची अस्मिता आणि अस्तित्वाची लढाई आहे. त्यामुळे सर्व शेतकरी, विशेषतः महिला भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सरकारचा डाव हाणून पाडावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी के. के. पाटील, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष वसंत अण्णा देशमुख, गिरीश फोंडे, प्रकाश पाटील, जि. प. सदस्य भारत शिंदे, माळशिरस पं.स.चे सभापती दत्ता मगर, बाळासो पाटील, शिवाजी पाटील, निशांत पाटील, उपळाईचे सरपंच दीपक देशमुख, विनंती कुलकर्णी, शरद पांढरे, सचिन जगताप, मारुती चव्हाण, संदीप पाटील, युवक काँग्रेसचे नितीन शिंदे, महेश व्यवहारे, सचिन हराळे, अभिजीत हराळे, बाळू अण्णा व्यवहारे, राजकुमार हराळे, रंजीत व्यवहारे, यांच्यासह सोलापूर जिल्ह्यातील बाधित शेतकरी, विविध संघटनांचे आणि शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नैसर्गिक शेती करून स्वताचे व जमिनीचे आरोग्य जपा

**आ. श्रीजया चव्हाण**

अर्धापूर : (स. गांवकरी)



रासायनिक शेतीमुळे जमिनीतील सुपीकता कमी झाल्यामुळे उत्पादनात मोठी घट झाली आहे. दिवसेंदिवस शेतीवरचा खर्च वाढत चालला आहे. मोठ्या प्रमाणावर चांगले पीक आणण्यासाठी रासायनिक खते व औषधीचा वापर वाढला आहे. त्यामुळे खर्च वाढतोय पण उत्पन्न काही निघत नाही. कॅन्सर सारखे दुर्धर आजारही वाढले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा पारंपरिक नैसर्गिक शेतीकडे वळण्याची गरज आहे. कमी खर्चात जास्तीचे उत्पन्न आणण्याबरोबरच स्वतःचे व जमिनीचे आरोग्य जपा असे आवाहन आमदार श्रीजयाताई चव्हाण यांनी केले. देळूब खु.येथील भाजपा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर कदम पाटील यांनी किसान मोर्चा च्या वतीने नैसर्गिक शेती कार्यशाळा व शेतकरी संवाद आयोजित करण्यात आला होता. यावेळी आ. श्रीजयाताई चव्हाण यांच्या हस्ते कार्यशाळेचे उदघाटन करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केशवगिरी संस्थानचे ज्ञानभारती महाराज हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा उपाध्यक्ष नागोराव भांगे, तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे, नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, शहराध्यक्ष योगेश हाळदे,माजी उपनराध्यक्ष राजेश्वर शेटे,माजी जि. प.सदस्य रामराव भालेराव, चेअरमन रावसाहेब गाढे, कृषिभूषण ह.भ.प. रामराव महाराज कदम, दत्तराव सूर्यवंशी, शास्त्रज्ञ शिवाजी शिंदे, विशाल बिऱ्हाडे आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना आ. श्रीजया चव्हाण बोलताना म्हणाल्या की, सध्या शेतीवर अनेक संकटाचा मारा आहे. अशा नाजूक परिस्थितीत ही सरकार शेतकऱ्यांच्या ठामपणे पाठीशी उभं आहे. भोकर मतदारसंघातही मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने जे काही करता येईल त्यासाठी चव्हाण परिवार नेहमीच तत्पर असतो. यावेळी शास्त्रज्ञांनीही नैसर्गिक शेती वर मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अवधूत कदम यांनी केले तर प्रास्ताविक संयोजक किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर कदम व आभार नागोराव भांगे यांनी मानले. यावेळी भाजयुमोचे अजय देशमुख,किसान मोर्चाचे गोविंद कदम, नगरसेवक सोनाजी सरोदे, भाजयुमोचे ता. उपाध्यक्ष कोंडीबा सूर्यवंशी, सोशल मीडिया तालुकाध्यक्ष गुरुराज रणाखाब,कुश भांगे पाटील, संतोष पवार, शंकर ढगे,उमेश सरोदे,चेअरमन माधवराव शिंदे,उपसरपंच जगदीश डाखोरे,सुरेश वळसे,बाबुराव क्षीरसागर, देविदास पताळे, सुनिल कदम,संगीता कोल्हे,परमेश्वर बंडाळे, विठ्ठल बंडाळे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस कारावास

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



दिनांक ११/०१/२०२० रोजी १२:३० वा. ओतूर पोलीस स्टेशन हद्दीतील १७ वर्षे वयाची अल्पवयीन मुलगी त्यांच्या घरा पासुन काहीअंतरावरअसणाऱ्या पाण्याच्या टाकीजवळ कपडे धुण्यासाठी गेली होती.पिडीत मुलगी कपडे धुत असताना आरोपी नामे रमेश सखाराम दाभाडे याने पिडीत मुलीस पाठी मागुन मिठी मारूनलज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करून पिडीत मुलीचा विनयभंग केला होता. सदरचा प्रकार घडल्यानंतर पिडीत मुलगी घाबरली व तीने तीचे आजोबा यांना आवाज देवून बोलावुन घेतले. पिडीत मुलीचे आजोबा आल्यानंतर तीने त्यांना सर्व घडला प्रकार सांगीतला. त्यानंतर पिडीतचे आजोबा यांनी आरोपी रमेश सखाराम दाभाडे यास घडल्या प्रकाराबाबत जाब विचारला असता त्याने पिडीत मुलीस व तीच्या आजोबास शिवीगाळ दमदाटी करून जिवे मारण्याची धमकी दिली होती. सदरच्या घडल्या प्रकाराबाबत पिडीत मुलीने दि:- ११/०१/२०२० रोजी ओतूर पोलीस स्टेशनला तकारदिल्याने आरोपी रमेश सखाराम दाभाडे याचे विरूध्द लैंगीक अपराधा पासुन बालकांचे संरक्षण अधि. २०१२ चे कलम ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. दाखल गुन्हयाचा पुढील तपास ओतूर पोलीस स्टेशन तत्कालीन प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक पी.एच. कांबळे यांनी करून आरोपीस अटक केले होते. यातील आरोपीचे विरोधात सबळ पुरावे प्राप्त करूनतपासी अधिकारी यांनी परिपुर्ण दोषा आरोपपत्र मा.न्यायालयात दाखल केले होते.

## नांदेड ग्रामीण पोलीसांनी छापा कार्यवाही करून ७२ लाख रूपये अवैध रेती जप्त करून पाच जणा विरुद्ध गुन्हा दाखल

नवीन नांदेड : (स. गांवकरी)




नांदेड ग्रामीण पोलीसांनी छापा कारवाई करुन अवैध रेती वाहतुक करणाऱ्या रेती माफियावर एकुण-05 आरोपीतां विरूध्द 02 गुन्हे दाखल करून 72,50 000/ -रुपयाचा मुद्देमाल केला जप्त केला असुन पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जिल्हयात अवैध वाळु वाहतुकीवर व अवैध धंदयावर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीन यांचे पथकाने प्रभावी कारवाई करत अवैध वाळू वाहतुक करणारा एक हायवा पकडला व गोदावरी घाटावर कारवाई करीत बोट, इंजीन, तराफे जप्त केले.

दिनांक 27 जुनं 26 रोजी पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथील अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना मिळालेल्या माहीती अवैध वाळु वाहतुक करणारे हायवा क्र MH28R7800 पकडुन वाळु वाहतुक करण्याचा परवाना नसल्याने सदर हायवा दोन पंचा समक्ष जप्त करूण गुन्हा दाखल केला व तसेच गोदावरी नदी पात्रातुन अवैध वाळू उपसा करणारे बोट, इंजीन, तराफे जप्त करूण एकुण 02 गुन्हे दाखल केले त्यामध्ये एकुण 05 आरोपी नामे समाधान बाबासाहेब जाधव रा.गोवर्धनघाट नांदेड ,अदिनाथ मोरे तुकाराम मोरे दोघे रा. भनगी अनोळखी दोन यांचे विरूध्द पो.स्टे नांदेड ग्रामीण गु.र.न. 783/2026, 784/2026 कलम 303(2),3(5) भा.न्या.सं, सहकलम 48 (7), 48(8) महराष्ट्र जमीन महसूल अधिनियम प्रमाणे एकुन 02 गुन्हे दाखल करूण 72,50,000/- रुपयाचा मुद्देमाल केला जप्त.

सदरची कारवाई डॉ. निलाभ रोहन, पोलीस अधीक्षक नांदेड,श्रीमती अर्चना पाटील,अपर पोलीस अधीक्षक,भोकर सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड प्रशांत शिंदे,उप विभागीय पोलीस अधिकारी, इतवारा नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोउपनि बाबुराव चव्हाण, पोउपनि व्यंकट कुसमे पोहेकॉ पोहेकॉ कानगुले, पोहेकॉ भिसे, पोकॉ जमीर, पोकॉ सिरमलवार, सर्व नेमणुक पो.स्टे. नांदेड ग्रामीण, यांनी केली.

जिल्हयात अवैध वाळु उत्खनन व वाहतुक, अवैध दारू, जुगार, गुटखा असे व्यवसाय करणा-या विरूध्द भविष्यातही अशाच कठोर कारवाया सुरू राहतील, असा इशारा पोलीस प्रशासनाकडुन देण्यात आला आहे.

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पाचही जिल्ह्यांत सक्षम यंत्रणा उभारणार – अप्पर आयुक्त दिनकर पावरा!





नाशिक : (स. गांवकरी)



आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी नाशिक विभागातील पाचही जिल्ह्यांमध्ये सक्षम व प्रभावी यंत्रणा उभारण्यात येणार असल्याची माहिती अप्पर आयुक्त दिनकर पावरा यांनी दिली. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'वार्तालाप' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे पाटील तसेच विविध पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान अप्पर आयुक्त दिनकर पावरा आणि उपआयुक्त निलेश अहिरे यांचा साईबाबांची मूर्ती, शाल, घड्याळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या भाषणात दिनकर पावरा यांनी आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी प्रशासन, शिक्षण विभाग आणि स्थानिक यंत्रणा यांच्यात अधिक प्रभावी समन्वय साधला जाईल, असे सांगितले. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मवेशी आश्रमशाळेतील विनयभंग प्रकरणाचा उल्लेख करताना, पालकमंत्र्यांच्या निर्देशानुसार संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच आदिवासी भागात सर्पदंशाच्या वाढत्या घटनांचा गांभीर्याने विचार करून तातडीची आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्यास उपस्थित राहण्याचे निमंत्रण मान्यवरांना देण्यात आले. कार्यक्रमात आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन, शिक्षण विभाग आणि स्थानिक यंत्रणा एकत्रितपणे कार्य करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## आळंदीत पल्स पोलिओ मोहिमेच्या लसीकरणास उत्साही प्रतिसाद

आळंदी : (स. गांवकरी)



राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमे अंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या धोरणानुसार आळंदी ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने आळंदी परिसरातील 19 केंद्र वर बस पोलिओचे लसीकरण करण्यात आले याच पालकांनी मोठा प्रतिसाद देत आपल्या बालकांना घेऊन लसीकरणासाठी येऊन लसीकरण करून घेतले आळंदी येथील आयोजित लसीकरण मोहिमेची पाहणी करण्यासाठी अतिरिक्त संचालक डॉ संदीप सांगळे, SMO डॉ चेतन खाडे यांनी ग्रामीण रुग्णालय आळंदी आणि माऊली मंदिर पोलिओ बूथ केंद्र येथे भेट देऊन कामकाजाची माहिती घेत संवाद साधला.या वेळी आळंदी ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ उर्मिला शिंदे यांचे सह नियुक्त कर्मचारी, आरोग्य सेवक उपस्थित होते. आळंदी खेड आणि आळंदी हवेली भागातील १९ केंद्रावर लसीकरणाची सोय करण्यात आली होती. परिसरातील उद्दिष्ट पेक्षा जास्त लसीकरण करण्यात आल्याचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. उर्मिला शिंदे यांनी सांगितले. उत्साहात लसीकरण अभियान राबविण्यात आले. आळंदी नगरपरिषद उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, कालिदास तापकीर, रुग्ण हक्क समिती सदस्य डी. डी. भोसले पाटील, ग्लोबल समाज सहाय्यक समितीचे मार्गदर्शक रामचंद्रकाका कुऱ्हाडे पाटील, आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, गोविंद ठाकूर आदी मान्यवर यांनी सदिच्छा भेट देत मुलाना पल्स पोलिओ डोस देत, कामाची माहिती घेत पाहणी केली. लसीकरण दिनी 6 हजार 258 लाभार्थ्यांचे उद्दीष्ट होते. यात 6 हजार 134 लाभार्थ्यांना लस पाजण्यात आली. sunare 98 टक्के काम लसीकरण दिनी सर्व केंद्र मिळून झाले. असे डॉ. उर्मिला शिंदे यांनी सांगितले.

# वन भोजनातून जलसंधारण कामाच्या समाधानाची तृप्ती

## आम्ही टाकळीकरच्या ३५ दिवसांच्या जल अभियानाची यशस्वी सांगता

पारनेर : (स. गांवकरी)



पावसाळी वातावरणातील थंड हवेतील आल्हादायक गारवा... त्यात घरच्या डब्यांमधील विविध व्यंजनांचा घमघमाट.. विविध प्रकारच्या चटण्या.. लोणची... झणझणीत लाल - हिरव्या मिरच्यांचा ठेचा.. तोंडी लावायला कांदा, लसूण, लिंबू, काकडीच्या फोडी... अन् ताज्या गावरान आंब्याचे पाड - जांभळांची स्वीट डिश... पंचतारांकित हॉटेलच्या महागड्या मेनूला फिकी पाडणारी असल गावरान फक्कड मेजवानी व सोबतीला निसर्गाच्या सानिध्यात जल अभिनयाच्या गप्पांची मैफील जमल्यावर आपोआप सर्वांची ब्रम्हानंदी टाळी लागली ...!

निमित्त होते आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानने नाम फाऊंडेशनसह विविध संस्थांच्या सहयोग व लोकसहभागातून राबविलेल्या जलसंधारण कामाच्या दुसऱ्या टप्प्याच्या यशस्वी सांगता पाहणी प्रसंगी आयोजित केलेल्या वन स्नेहभोजनाची. आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक, पत्रकार चाँद शेख यांनी जल अभियानाचे विवेचन करताना वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या सामाजिक प्रकल्पांची माहिती देत शिक्षण, आरोग्य व जलसंवर्धन या त्रिसूत्रीवर ग्रामविकासाची चळवळ आम्ही टाकळीकर राबवत असल्याचे सांगितले.

यावेळी आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा पुणे नोबेल हॉस्पिटलचे वरिष्ठ संचालक डॉ. बाळासाहेब बांडे, शिक्षक नेते रावसाहेब रोहोकले, सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब खिलारी, आम्ही टाकळीकरचे स्थानिक समन्वयक संतोष सोनवळे, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, माजी सरपंच शिवाजी खिलारी, उपसरपंच रामभाऊ तराळ, ग्रा. पं. सदस्य दत्तात्रय निवडुंगे, प्रताप खिलारी, संदीप खिलारी, मेजर दिगंबर शेळके, आदिनाथ पायमोडे, मंगेश खिलारी, दादाभाऊ नवले, संदीप झावरे, आनंदा झरेकर, श्रावण गायकवाड, प्रा. किसन पायमोडे, नानासाहेब झावरे, रविंद्र पायमोडे, वसंत रांधवण, संजय कुसकर, दादा निवडुंगे, राहुल धुमाळ, नितीन धुमाळ, महेश धुमाळ, शिवाजी कोरडे, सचिन बांडे, महेश ठाणगे, जालिंदर बांडे, संकेत थोपटे, दीपक दूस, गणेश चव्हाण, शुभम गुंदेचा, कृष्णा बांडे, सागर थोपटे, संजय झावरे, अतुल सैद, नितीन ढोकळे, विष्णू बद्रे, नितीन ढोकळे, बाबाजी कासुटे आदींसह युवक, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नाम फाऊंडेशन, टाटा मोटर्सने टाकळी ढोकेश्वर येथे आम्ही टाकळीकरच्या माध्यमातून झालेल्या यशस्वी जल अभियानामुळे प्रभावित होऊन पुढच्या वर्षी मार्चमध्येच या कामांना पुन्हा मंजुरी दिली असून राज्य शासनाच्या माध्यमातून या अभियानास सर्व मदत मिळणार असल्याची माहिती नाम फाऊंडेशनचे जिल्हा समन्वयक विशाल नगरे व टाटा मोटर्सचे जिल्हा समन्वयक प्रसाद जाधव यांनी यावेळी दिली.

# थोडक्यात पण महत्वाचे



## आमदार नंदकिशोर महाजन यांचा जाहीर सत्कार

रावेर (स. गांवकरी) : नुकत्याच झालेल्या विधानपरिषदेच्या निवडणुकीत जळगाव जिल्ह्यातून रावेर तालुक्याचे युवा नेतृत्व मा. श्री. नंदकिशोर (भाऊ) महाजन यांनी विक्रमी मताधिक्याने विजय मिळवून , विधानपरिषदेचे आमदार म्हणून शपथ घेतली. या ऐतिहासिक विजयाबद्दल त्यांच्या गौरवासाठी आदिवासी कोळी बहुउद्देशीय शिखर संस्था, रावेर ता . रावेर यांच्या वतीने रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी तांदलवाडी येथे त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास आदिवासी कोळी समाजातील माता-भगिनी, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी आमदार नंदकिशोर महाजन यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मनोहर पंडीत कोळी उपाध्यक्ष विनोद रामचंद्र कोळी सचिव योगेश्वर विश्वनाथ कोळी , सहसचिव सुभाष सुकदेव सपकाळे, खजिनदार विक्की कृष्णा कोळी , कार्याध्यक्ष भूषण प्रकाश तायडे , प्रसिद्धी प्रमुख शुभम सुनिल कोळी, सल्लागार अशोक रामदास कोळी, किरण सोपान कोळी, गोपाळ सुधाकर कोळी, प्रमुख सल्लागार विनोद रामदास कोळी, सदस्य संतोष वामन सपकाळे, संदीप तुकाराम महाले, विजय देविदास कोळी, सुपडू दोधू मोरे, समाधान सदाशिव कोळी, ईश्वर शालीग्राम कोळी, विनोद मिठाराम कोळी, जयराम चिंतामण कोळी, शरद सुपडू कोळी, उमेश मोहन कोळी, ज्ञानेश्वर पुंडलिक खवले, तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, सल्लागार आणि सदस्य उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थितांनी समाजाच्या एकजुटीचा संदेश देत भविष्यातही समाजहितासाठी अशाच उपक्रमांचे आयोजन करण्याचा निर्धार व्यक्त केला.


## नाशिकमध्ये स्टार हेल्थचे पहिले विभागीय कार्यालय

नाशिक (स. गांवकरी) : भारतातील आघाडीची आरोग्य विमा कंपनी स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने नाशिक येथे पहिले विभागीय (झोनल) कार्यालय सुरू केले. मुंबई नाका येथील श्री कालिका प्लाझामधील ५,००० चौ. फूट क्षेत्रफळाच्या या कार्यालयाचे उद्घाटन स्टार हेल्थ इन्शुरन्सचे बिझनेस हेड विजय अरोरा यांच्या हस्ते झाले. या कार्यालयात १५० हून अधिक व्यक्तींसाठी क्षमता असून ९,००० पेक्षा अधिक सल्लागारांसाठी प्रशिक्षण व परिषद सुविधा उपलब्ध आहेत. नाशिकमध्ये कंपनीची ४ कार्यालये, १ विमा केंद्र आणि ९,००० हून अधिक सल्लागारांचे नेटवर्क कार्यरत आहे. स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्सचे पूर्णवेळ संचालक हिमांशु वालिया यांनी नाशिक हे वेगाने विकसित होणारे आरोग्य विमा बाजार असून झोनल कार्यालयामुळे ग्राहक, रुग्णालये व सल्लागारांशी अधिक प्रभावी संपर्क साधता येईल, असे सांगितले. महाराष्ट्रात आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये कंपनीने ३.५ लाखांहून अधिक जणांना विमा संरक्षण दिले असून २,३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक मूल्याच्या दाव्यांचे निराकरण केले आहे. विजय अरोरा यांनी सांगितले की, नव्या कार्यालयामुळे नाशिक व आसपासच्या भागातील ग्राहक सेवा अधिक सक्षम होणार आहे. कंपनीच्या सीएसआर उपक्रमांतर्गत राज्यातील ५ आरोग्य सेवा केंद्रांद्वारे आतापर्यंत सुमारे १५ हजार लाभार्थ्यांना सेवा देण्यात आली आहे.



## वट पौर्णिमा उत्साहात साजरी

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर येथे वट पौर्णिमेचा सण सोमवारी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच विवाहित महिलांनी पारंपरिक वेशभूषेत वडाच्या वृक्षाजवळ एकत्र येऊन विधीवत पूजा केली. वडाच्या झाडाला दोरा गुंडाळत पतीच्या दीर्घायुष्यासाठी, कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी आणि अखंड सौभाग्यासाठी प्रार्थना केली. यावेळी महिलांनी वटसावित्रीची कथा श्रवण केली तसेच एकमेकींना वाण देऊन शुभेच्छांची देवाणघेवाण केली. अनेक ठिकाणी महिला बचत गट, ग्रामसंघ आणि विविध सामाजिक संस्थांच्या वतीने सामूहिक वटपूजनाचे आयोजन करण्यात आले. पारंपरिक गीते, उखाणे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे वातावरण अधिक मंगलमय झाले. यंदा वट पौर्णिमेनिमित्त मंदिर परिसर व वडाच्या वृक्षाजवळ भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. महिलांनी भारतीय संस्कृतीतील परंपरा आणि धार्मिक श्रद्धा जपत उत्साहपूर्ण वातावरणात हा सण साजरा केला.



## जितेंद्र डोके यांचे निधन

शिवनेरी (स. गांवकरी) : कुमशेत श्री शिवछत्रपती गणेशोत्सव मंडळ शिवाजी चौक येथील जेष्ठ सदस्य जितेंद्र हिरामण डोके वय ३५ यांचे निधन झाले आहे. यांच्या पाठीमागे वडील, पत्नी, दोन मुली, एक मुलगा , चुलते, तिन बहीन, मेव्हणे, आत्या, मामा असा मोठा परिवार आहे. डोके यांनी शेती चांगली पिकवली आहे.

## साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

ठाणे (स. गांवकरी) : सांस्कृतिक संचालनालय, महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजने' अंतर्गत पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांकडून दि. १ जुलै ते ३१ जुलै, २०२६ या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. कला व साहित्य क्षेत्रात दीर्घकाळ मोलाचे योगदान देणाऱ्या आणि आर्थिकदृष्ट्या गरजू असलेल्या ज्येष्ठ कलावंत व साहित्यिकांना या योजनेअंतर्गत प्रतिमहिना रु. ५,०००/- मानधन देण्यात येते, अशी माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे यांनी दिली. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि. १६ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयानुसार ही योजना राज्यभर राबविण्यात येत असून कला, साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्यासोबतच ज्येष्ठ कलाकारांना आर्थिक आधार देणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. या योजनेसाठी अर्ज करणाऱ्या कलावंताचे वय किमान ५० वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. दिव्यांग कलावंतांना वयोमर्यादेत १० वर्षांची शिथिलता देण्यात आली आहे. अर्जदाराने कला किंवा साहित्य क्षेत्रात किमान १५ वर्षे सातत्यपूर्ण योगदान दिलेले असावे. ज्यांनी साहित्य, लोककला, नाट्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला, लोकपरंपरा किंवा इतर कलाक्षेत्रात दर्जेदार आणि उल्लेखनीय कार्य केले आहे, अशा कलाकारांचा प्राधान्याने विचार करण्यात येणार आहे.

# अपंग कर्मचारी संघटनेतर्फे आमदार गोकुळभाऊ गीते यांचा सत्कार

नाशिक : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य विधान परिषदेवर सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल आमदार गोकुळभाऊ गीते यांचा त्यांच्या निवासस्थानी महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी/अधिकारी संघटनेचे राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.यावेळी मनपा स्थायी समितीचे माजी सभापती गणेशभाऊ गीते तसेच नगरसेविका दीपालीताई गणेश गीते यांचाही शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास संघटनेच्या मार्गदर्शक शाम बर्वे, राज्य उपाध्यक्ष सतीश लाड,सहसचिव सोमा भालनोर,संचालक मनोहर नेतावाटे,विभागीय कोषाध्यक्ष सुरेश कापडणीस,विलास पाटील,गिरीश पवार, इंजि.राजेंद्र शिंदे आदिंसह दिव्यांग बांधव उपस्थित होते.



यावेळी दिव्यांग कर्मचारी, अधिकारी व बांधवांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आमदार गोकुळभाऊ गीते यांनी महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेच्या कार्याचे कौतुक करत दिव्यांगांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि त्यांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी कायम सकारात्मक सहकार्य करण्याची ग्वाही दिली.शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र दिव्यांगांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावा आणि त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची भूमिका त्यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी बोलताना संघटनेचे राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणेसर यांनी संघटनेच्या माध्यमातून दिव्यांग कर्मचारी,अधिकारी व बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले.राज्यभरातील दिव्यांगांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी संघटना अभ्यासपूर्ण व सकारात्मक पद्धतीने कार्यरत असून, शासन आणि प्रशासनाशी समन्वय साधत न्याय मिळवून देण्यासाठी संघटना कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी आमदार गोकुळभाऊ गीते यांना पुढील लोकहितकारी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

> महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे कार्य दिव्यांग कर्मचारी, अधिकारी व बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने,अभ्यासपूर्ण आणि प्रभावीपणे सुरू आहे. संघटनेचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे. दिव्यांगांच्या न्याय्य मागण्यांसाठी माझे सदैव सकारात्मक सहकार्य राहील आणि शासन स्तरावर त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे.
>
> **- आमदार गोकुळभाऊ गीते सदस्य, महाराष्ट्र राज्य विधान परिषद**

> आमदार गोकुळभाऊ गीते यांची महाराष्ट्र राज्य विधान परिषदेवर झालेली निवड ही समाजसेवा, जनसंपर्क आणि लोकहितासाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची पावती आहे. गीते बंधूंनी सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सहकार आणि दिव्यांग कल्याण क्षेत्रात केलेले कार्य निश्चितच प्रेरणादायी आणि अनुकरणीय आहे. सर्वसामान्य नागरिकांसह दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांबाबत त्यांनी नेहमीच संवेदनशील भूमिका घेतली आहे. त्यांच्या अनुभवपूर्ण नेतृत्वातून समाजहिताची अनेक विधायक कार्ये घडतील, असा आम्हाला विश्वास आहे. त्यांच्या पुढील सार्वजनिक जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!
>
> **- बाळासाहेब सोनवणे सर, राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना**

## मुसळधार पावसामुळे अकोले तालुक्यातील आंबित धरण ओव्हरफ्लो

कोतुळ : (स. गांवकरी)

हरिश्चंद्रगडाच्या [पाणलोट क्षेत्रात आणि घाटमाथ्यावर झालेल्या जोरदार मुसळधार पावसामुळे अकोले तालुक्यातील मुळा नदीवर असलेले आंबित धरण पूर्ण क्षमतेने भरून ओव्हरफ्लो झाले आहे. चालू मान्सून हंगामात अहिल्यानगर जिल्ह्यातील पूर्ण भरलेले हे पहिलेच धरण ठरले आहे. हरिश्चंद्रगड आणि पाचनई परिसरात पावसाचा जोर कायम असल्याने धरणाच्या सांडव्यावरून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरू झाला असून, मुळा नदी आता पूर्ण प्रवाही झाली आहे. धरणाची साठवण क्षमता आणि सद्यस्थितीचा विसर्ग मुळा खोऱ्यातील हा पहिला महत्त्वाचा लघु प्रकल्प असून, आंबित धरणाची एकूण साठवण क्षमता १९३.९७ दशलक्ष घनफूट (दलघफू) इतकी आहे. सध्या पाणलोट क्षेत्रातील पाऊस टिकून असल्याने धरणाच्या भिंतीवरून (सांडव्यावरून) सुमारे



१०० ते २०० क्युसेक (Cusecs) वेगाने पाण्याचा विसर्ग थेट मुळा नदीच्या पात्रात सुरू आहे. या विसर्गामुळे परिसरातील छोटे-मोठे ओढे आणि नाले दुथडी भरून वाहत आहेत. आंबित धरणाचे ओव्हरफ्लो झालेले हे पाणी आता पुढे सरकत थेट पिंपळगाव खांड धरणाच्या दिशेने झेपावले आहे. हे पाणी कोतुळ येथील ऐतिहासिक कोतुळेश्वर मंदिराजवळील कोल्हापूर पद्धतीचा बंधारा ओलांडून पिंपळगाव खांड धरणाच्या जलाशयात दाखल झाले आहे. आंबितमधून सातत्याने होणाऱ्या या विसर्गामुळे पिंपळगाव खांड धरणाच्या सद्यस्थितीतील पाणीसाठ्यात झपाट्याने आणि कमालीची वाढ होत आहे.

## सोलापूर जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांना १३ नवीन वाहनांचे वितरण

### ९८ शिक्षकांना केले केंद्रप्रमुख

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांना १३ नवीन वाहनांचे वितरण करण्यात आले; आणि शिक्षण विभागातील ९८ शिक्षकांना केंद्रप्रमुख म्हणून

पदोन्नती देण्याचे आदेश देण्यात आले असून १०,५२० कर्मचाऱ्यांसाठी ऐतिहासिक सुरक्षा कवच सॅलरी पॅकेज करार करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषद सोलापूरमध्ये विकास, कर्मचारी कल्याण आणि प्रशासन अधिक गतिमान करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णयांची अंमलबजावणी करण्यात आली. जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांना १३ नवीन वाहनांचे वितरण, ९८ शिक्षकांना केंद्रप्रमुख पदोन्नतीचे आदेश तसेच जिल्हा परिषदेच्या १० हजार ५२० अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी स्टेट बँक ऑफ इंडियासोबत अभिनव सॅलरी पॅकेज योजनेचा सामंजस्य करार (MOU)



अशा तीन महत्त्वपूर्ण उपक्रमांमुळे हा कार्यक्रम विशेष ठरला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांसाठी खरेदी करण्यात आलेल्या १३ नवीन वाहनांचे लोकार्पण व वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीचे सभापती इंद्रजीत पवार, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ॲड. अमृता वाघे, कृषी व पशुसंवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार, समाजकल्याण समितीच्या सभापती संस्कृती सातपुते यांच्यासह पंचायत समिती दक्षिण सोलापूरचे सभापती संदीप टेळे, उत्तर सोलापूरच्या सभापती तेजस्विनी बोराडे, माढ्याचे सभापती पंडित देशमुख, माळशिरसचे सभापती दत्तात्रय मगर, मंगळवेढ्याच्या सभापती दीपाली लाड, सांगोल्याच्या सभापती पुनम इंगवले तसेच करमाळ्याच्या सभापती पूजा ढेरे यांना वाहनांचे वितरण करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी बोलताना म्हणाले की ही वाहने क्षेत्रभेटी, विकासकामांचा आढावा, ग्रामस्थांशी थेट संवाद तसेच ग्रामीण भागातील विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपयुक्त ठरणार आहेत. त्यामुळे प्रशासन अधिक गतिमान, उत्तरदायी आणि लोकाभिमुख होण्यास मोठी मदत

यावेळी पालकमंत्री मा. जयकुमार गोरे यांनी वितरण प्रसंगी मार्गदर्शन करताना, 'ही गाडी केवळ प्रवासासाठी नसून जनसेवेचे प्रभावी साधन आहे. तिचे प्रत्येक चाक ग्रामीण विकास, *लोककल्याण आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी फिरले पाहिजे. असे नमूद केले.

# सोलापूरच्या विवाह सोहळ्यात रंगले जपानी पाहुणे!

### 'झिंगाट' गाण्यावर धरला ठेका, सोलापूरकरांच्या आदरातिथ्याने भारावले

सोलापूर : (स. गांवकरी)

येथील ज्येष्ठ पत्रकार स्वर्गीय जे .टी.कुलकर्णी यांचा नातू आणि जितेश कुलकर्णी यांचा मुलगा सौरभ याच्या विवाह सोहळ्यानिमित्त सोलापूरमध्ये आंतरराष्ट्रीय संस्कृतीचा अनोखा संगम पाहायला मिळाला. या विवाहासाठी थेट जपान आणि सिंगापूरहून तब्बल १० ते १२ परदेशी मित्र सोलापूर नगरीत दाखल झाले होते. या पाहुण्यांनी केवळ लग्नाला हजेरीच लावली नाही, तर अस्सल सोलापुरी आदरातिथ्याचा मनमुराद आनंद घेतला.

सोलापुरात आगमन झाल्यानंतर या परदेशी पाहुण्यांचे स्वागत पत्रकार रवींद्र मस्के आणि पत्रकार विनायक होटकर यांनी केले. दोन दिवसांच्या या मुक्कामात पाहुण्यांनी सोलापूरच्या प्रसिद्ध खाद्यसंस्कृतीचा आस्वाद घेतला. त्यांनी सकाळी सोलापूरची प्रसिद्ध 'सुधा इडली'



आणि दुपारी 'प्रीती केटरर्स'च्या रुचकर जेवणावर ताव मारला. सोलापुरी खाद्यपदार्थांची चव त्यांना कमालीची आवडली.

भारतीय विवाह पद्धती आणि संस्कृतीबद्दल प्रचंड उत्सुकता असलेल्या या जपानी मित्रांनी लग्नातील सर्व विधी अतिशय उत्सुकतेने पाहिले आणि त्यात सहभागही घेतला. संगीत कार्यक्रमात तर या पाहुण्यांनी परिसीमा गाठली; 'सैराट' चित्रपटातील लोकप्रिय 'झिंगाट' गाण्यावर त्यांनी मनसोक्त ठेका धरत उपस्थितांची मने जिंकून घेतली. विशेष म्हणजे, पत्रकार अविनाशजी कुलकर्णी यांनी या जपानी पाहुण्यांना थेट मोटारसायकलवर (बाईक) बसवून सोलापूरच्या विविध भागांत फेरफटका मारून आणला. बाईकवरून सोलापूर सफर करण्याचा हा अनुभव त्यांच्यासाठी अत्यंत थरारक आणि संस्मरणीय ठरला. सोलापूरची संस्कृती, खाद्यभ्रमंती, लग्नविधी आणि येथील लोकांचे अगत्य यांमुळे आपण भारावून गेलो असल्याचे या परदेशी पाहुण्यांनी सांगितले. सोलापूरकरांच्या या अनोख्या आदरातिथ्याची आणि प्रेमाची आठवण आपण आयुष्यभर सोबत घेऊन जात असल्याची भावना त्यांनी शेवटी व्यक्त केली. सध्या या अनोख्या लग्नाची आणि जपानी पाहुण्यांच्या 'झिंगाट' डान्सची चर्चा सोलापूरकरांमध्ये चांगलीच होती.

## ऑनलाईन तिकीट सुविधाही उपलब्ध असणार

सोलापूर : (स. गांवकरी)

केंद्र शासनाच्या पीएम ई-बस सेवा योजनेअंतर्गत सोलापूरसाठी मंजूर झालेल्या १०० इलेक्ट्रिक बसेसच्या आगमनाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. नव्या बसेसची लांबी ९ आणि १२ मीटर असून ऑनलाईन तिकीट सुविधाही उपलब्ध असणार आहे. न्यू बुधवार पेठेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाहनतळाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले असून, १५ ऑगस्टपर्यंत किमान १५ ते ३० ई-बस नागरिकांच्या सेवेत दाखल होतील. शहरासाठी मंजूर झालेल्या १०० बसेसमुळे नागरिकांची सुविधा होणार आहे. न्यू बुधवार पेठ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाहनतळाचे बांधकाम सुमारे ८० टक्के पूर्ण झाले असून 'बिहाइंड द मीटर' (बीटीएम) वीज पायाभूत सुविधांची ९५ टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित कामे जुलैअखेर पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.



वाहनतळासाठी आवश्यक असलेली ३३ केव्ही वीजवाहिनी, ५००० केव्हीए क्षमतेची वीज यंत्रणा, चार्जिंग स्टेशन, कार्यशाळा, प्रशासकीय इमारत आणि वॉशिंग एरिया आदी सुविधांचे काम प्रगतीपथावर आहे. उपकेंद्र व केबल टाकण्याची कामे पूर्ण झाली आहेत. पूर्वी शहरातून ठराविक वेळेला एक रिंगरूट बस असायची. जी संपूर्ण शहराच्या सीमारेषांना स्पर्श करत फिरायची. त्याचप्रकारे दोन बस एकमेकांविरूध्द दिशेला सोडाव्यात, ज्याचा अनेकांना फायदा होईल. बैठकीत ई-बस संचालनासाठी केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या जेबीएम प्रा. लि., नवी दिल्ली या कंपनीसोबतच्या करारातील अटी-शर्तींवर चर्चा करण्यात आली.

## १ जुलै रोजी ठाणे जिल्हा परिषदेतर्फे 'कृषी दिन' उत्साहात साजरा होणार

ठाणे : (स. गांवकरी)

- प्रगतशील शेतकरी, बचत गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचा होणार सन्मान

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांनी राज्याच्या कृषी विकासासाठी दिलेल्या अमूल्य योगदानाच्या स्मरणार्थ त्यांचा जन्मदिन १ जुलै हा दरवर्षी 'कृषी दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने यावर्षीही जिल्हा परिषद ठाणे कृषी विभाग व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. १ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता बी. जे. हायस्कूल, टेंभी नाका, ठाणे येथे कृषी दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमामध्ये जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्यांचा, महिला बचत गटांचा तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण प्रयोग, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करणाऱ्या घटकांचा गौरव करून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा देण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे आहे. कार्यक्रमादरम्यान कृषी, फलोत्पादन, सेंद्रिय शेती, जलव्यवस्थापन, पशुसंवर्धन, कृषी प्रक्रिया उद्योग, शेतकरी उत्पादक कंपन्या, हवामान बदल आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यांसारख्या विविध विषयांवर तज्ज्ञ व्याख्याते मार्गदर्शन करणार आहेत. शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळावी आणि त्याचा प्रत्यक्ष उपयोग करता यावा यासाठी विविध विभागांच्या माहितीपर प्रदर्शन स्टॉल्सचे आयोजनही करण्यात आले .

## ढवळपुरी येथे भव्य श्रीराम मंदिर लोकार्पण व प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला भक्तीमय वातावरणात प्रारंभ!

पारनेर : (स. गांवकरी)

तालुक्यातील ढवळपुरी येथे ग्रामस्थांच्या अभूतपूर्व सहकार्यातून उभारण्यात आलेल्या भव्य श्रीराम मंदिराचा मूर्ती प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण व मंदिर लोकार्पण सोहळा सोमवार, दि. २९ जून २०२६ पासून अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात सुरू झाला आहे. बुधवार, दि. १ जुलै २०२६ पर्यंत चालणाऱ्या या सोहळ्याच्या पहिल्याच दिवशी गावातून श्रीरामांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गावातील अबालवृद्ध, महिला व युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रीक्षेत्र दुर्गामातेच्या कुशीत वसलेल्या या पवित्र स्थळी सध्या विविध धार्मिक विधी, होम-हवन आणि यज्ञाचे




आयोजन करण्यात आले आहे.

सोहळ्याच्या पहिल्या दिवशी वास्तुशांती, ग्रामप्रदक्षिणा व विविध अधिवास विधी पार पडले. मंगळवार, दि. ३० जून रोजी गणेश पूजन, नवग्रह स्थापना, रुद्र, विष्णू व रामयाग, होम-हवन आणि श्री दुर्गामातेची कावड यात्रा होणार आहे.

मुख्य सोहळा आणि उपस्थिती

बुधवार, दि. १ जुलै रोजी सकाळी कलश प्रतिष्ठापनेनंतर श्रीराम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा, महापूजन, कलश कुंभाभिषेक आणि महाआरती संपन्न होईल. या मुख्य दिवशी सकाळी ११ ते १ या वेळेत महंत ह.भ.प. गुरुवर्य रामगिरीजी महाराज (मठाधिपती, सराला बेट) यांच्या हस्ते कलशारोहण, प्राणप्रतिष्ठा व कीर्तनसेवा पार पडणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिरूर येथील पोखरणा उद्योग समूहाचे सुवालाल पोखरणा हे असून, जिल्ह्यातील व तालुक्यातील सर्वपक्षीय राजकीय नेते या प्रसंगी उपस्थित राहणार आहेत.

नव्याने उभारण्यात आलेल्या या श्रीराम मंदिरामुळे ढवळपुरीच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवात मोठी भर पडणार असून हा सोहळा गावाच्या इतिहासातील एक संस्मरणीय पर्व ठरेल. ढवळपुरी गावच्या सरपंच नंदाताई भागाजी गावडे यांनी या कार्यक्रमाला सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.